माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १४/२०२६, ८९/२०२६**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. किशोर गजाननराव लोखंडे, २२, सौभाग्य नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर - ३४ | अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग, (माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर | शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर |

**सुनावणी दिनांक २५.०८.२०२६**

तक्रारकर्ता श्री. किशोर गजाननराव लोखंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ५१०/२०२५ मध्ये दिनांक १७.११.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

सदर तक्रारीवर आज दिनांक २५.०८.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, शिक्षण विभाग (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर, श्री. लक्ष्मीकांत खाडे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी कार्यालय (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर, श्री. अरुण प्र. कोठाळे आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ५१०/२०२५ मध्ये दिनांक १७.११.२०२५ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात आले आहे.

“ व्दितीय अपील क्र. ५१०/२०२५ मध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपिलार्थी श्री. किशोर गजाननराव लोखंडे यांनी मागितलेली माहिती रेकॉर्डवर उपलब्ध असल्यास ती तात्काळ विनामुल्य अपिलार्थीस पुरविण्यात यावी आणि माहिती रेकॉर्डवर उपलब्ध नसल्यास तसे कारणांसह अपिलार्थीस स्पष्टपणे कळविण्यात यावे.” या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात आले होते.

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २९.०१.२०२६ (प्राप्त दि. २९.०१.२०२६) व १६.०३.२०२६ रोजी आयोगाकडे एकाच व्दितीय अपीलावर २ तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

असे नमुद केले आहे की, " मी आपणास सविनय विनंती करतो की, माझे दि २८.१०.२०२४ व दि. १४.०१.२०२५ च्या अर्जान्वये मी मागितलेली माहिती मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचे कार्यालयाकडून अजूनही अप्राप्त आहे. आपणासमोर सुनावणीच्या वेळी मला अपिलार्थीस माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती पुरवण्याची तयारी दर्शविली होती परंतु याबाबत आपले दि. २३.१२.२०२५ च्या पत्रान्वये निर्देशीत करुनही त्यावर अजूनही ७४ दिवस होऊन सुध्दा त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी आपणास नम्र विनंती की पुनश्च आपल्या कार्यालयामार्फत योग्य ती कार्यवाही करुन मी मागितलेली माहिती शक्य तितक्या लवकर मला प्राप्त करुन द्यावी. की जेणेकरुन माझ्या सेवानिवृत्तीसाठी ते योग्य होईल. कारण माझी सेवानिवृत्ती लवकरच यावर्षीच होत आहे. करीता आपणास पुनश्च नम्र विनंती की मला न्याय द्यावा. " असे नमूद करुन आयोगास विनंती केली आहे.

तक्रारकर्ता यांच्या दिनांक २९.०१.२०२६ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग, (माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १४/२०२६/१४०२, दिनांक १८.०२.२०२६ अन्वये " द्वितीय अपील क्र. ५१०/२०२५ संदर्भांत राज्य माहिती आयोग कार्यालयात दिनांक १७.११.२०२५ रोजी सुनावणी होऊन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशास अनुसरुन व तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल आयोग कार्यालयास त्वरित सादर करण्यात यावा" असे कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार व सदर तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल सादर केल्याचे दिसून येत नाही.

**युक्तीवाद/खुलासा**:- आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. किशोर गजाननराव लोखंडे उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, मा. आयोगासमोर व्दितीय अपील क्र. ५१०/२०२५ मध्ये दि. १७.११.२०२५ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार मा. आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्याबाबत आदेशीत केले होते, परंतु त्यानुसार अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळाली नाही. तसेच मी एक महिन्यानंतर सेवानिवृत्त होणार असल्यामुळे सदर माहिती मला आवश्यकता आहे. त्यामुळे सबंधितांना मागितलेली माहिती तात्काळ देण्याबाबत आदेशित करावे.

त्यावर आज सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी सन १९९३ ते १९९५ या कालावधीतील माहिती मागितली आहे. सदर माहितीचा शोध घेतला असता माहिती आढळून न आल्यामुळे तक्रारकर्त्यास माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. तरी पुनश्च: तक्रारकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेवून उपलब्ध झालेली माहिती तक्रारकर्त्यास पुरविता येईल.

**निष्कर्ष**:- सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व आज सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकूण घेतल्यानंतर आयोगाकडून विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, तक्रारकर्ता यांच्या दि. २८.१०.२०२४ रोजीच्या मूळ माहिती अर्जात मागितलेली माहिती कार्यालयीन



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
*नागपूर*

अभिलेखावर उपलब्ध असल्याप्रमाणे त्यांना तात्काळ पुरविण्यात यावी. माहिती उपलब्ध नसेल तर तसे तक्रारकर्त्यास कारणांसह लेटरहेड वर माहिती अधिकाराचा लोगो वापरून लेखी स्वरुपात स्पष्टपणे कळवावे, या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

उपरोक्त निष्कर्षाच्या अधिन राहुन तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : नागपूर
दिनांक: २५.०८.२०२६

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

जा.क्र. 2232 दि. 08 SEP 2026

E:\SN/25.08.2026/तक्रार क्र.14,89-26-लोखंडे